पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७०१ /२०१५
दिनांक : ०१/१०/२०१५

प्रति,

मा......................................
सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दिनांक **०७/१०/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०७/१०/२०१५** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २**

दिनांक : **०७/१०/२०१५** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०७/१०/२०१५** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक १७/०६/२०१५, ०१/०७/२०१५ व १५/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१९)** सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक १५/०७/२०१५ व १७/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.२०)** सभावृत्तांत कायम करणे.

इ) दिनांक १४/०९/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) म.न.पा.चा इंद्रायणीनगर से.नं.०१ भोसरी येथील बॅडमिंटन हॉल राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र, पुणे ०६ या संस्थेस दरमहा र.रु.८,९५९/- सेवा शुल्क देऊन (फक्त एक कोर्टचे भाडे) दि.०१/०२/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर ११ महिने कालावधीसाठी चालविणेस मुदतवाढ देणे व दि.०१/०३/२०१४ ते दि.३१/०१/२०१५ अखेर मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०७/१०/२०१५ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) कु.निशा राजकिशोर चिंतोळे, चिंचवड, पुणे हिची Special Olympic world Games, Los Angeles 2015 मध्ये व्हॉलीबॉल या खेळाच्या स्पर्धेसाठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि.२४/०७/२०१५ ते ०२/०८/२०१५ या काळात लॉस अँजेलीस, कॅलीफोर्निया, यु.एस.ए. येथे उपस्थित राहणेकामी क्रीडा धोरणानुसार कु.निशा राजकिशोर चिंतोळे यांचे नावे आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- ( अक्षरी र.रु.एक लाख फक्त ) अदा करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांचे मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११ ०१९ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१५ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड मनपाचे कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र प्रेमलोक पार्क चिंचवड पुणे ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१४ ( पुरुष,

महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस येणा-या अंदाजे र.रु. ३,४१,८४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,७१,८४०/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरीता चहापान व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) कु.वर्षा रमेश नागराळ, निगडी, पुणे ४४ हिची Special Olympic world Games, Los Angeles 2015 मध्ये व्हॉलीबॉल या खेळाच्या स्पर्धेसाठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि.२४/०७/२०१५ ते ०२/०८/२०१५ या काळात लॉस अँजेलीस, कॅलीफोर्निया, यु.एस.ए. येथे उपस्थित राहणेकामी त्यांना क्रीडा धोरणानुसार वर्षा रमेश नागराळ यांचे नावे आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/-( अक्षरी र.रु.एक लाख फक्त ) अदा करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) कुमार भरत लहु पाटील, भोसरी, पुणे ३९ याची Special Olympic world Games, Los Angeles 2015 मध्ये सायकलिंग या खेळाच्या स्पर्धेसाठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि.२४/०७/२०१५ ते ०२/०८/२०१५ या काळात लॉस अँजेलीस, कॅलीफोर्निया, यु.एस.ए. येथे उपस्थित राहणेकामी त्यांना क्रीडा धोरणानुसार भरत लहु पाटील, भोसरी, पुणे ३९ यांचे नावे आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- ( अक्षरी र.रु.एक लाख फक्त ) अदा करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहापान अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी, कोटेशन/ निविदा पध्दतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा चहापान, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ. सन २०१५-१६ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी मनपा शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवासखर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे प्रस्तावात नमुद प्रमाणे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.१३,१४,५००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा निधी वार्षिक क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी/विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालय

/ उद्यान (स्थापत्य) मार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग संबंधीत क्षेत्रीय कार्यालये यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचारक करणे.

विषय क्र.७) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १२०६, दि.२०/१०/२०११ व आदेश क्र.क्रीडा /७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे क्रीडाधोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग दोन वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापिठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१२-१३ व २०१३-१४ चे लाभार्थी ६२ खेळाडूंच्या प्राविण्याबाबत संबंधित क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता २४ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा अहवाल दिलेला आहे. प्रस्तावात नमुद २४ पात्र खेळाडूंना दत्तक योजना २०१५-१६ चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या र.रु.३३,००,०००/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकरणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) महापौर चषक क्रीडा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव देणेची कार्यवाही करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापनेपासून ते आजतागायत मा.महापौर पदाचा कार्यभार सांभाळलेल्या मा.महापौर यांची नावे ,कालावधी यांची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. | मा.माजी महापौर यांची नावे | कालावधी |
|---|---|---|
| १ | मा.ज्ञानेश्वर पांडुरंग लांडगे | दि.२३/३/१९८६ ते १९/३/१९८७ |
| २ | मा.कै.भिकू वाघेरे (पाटील) | दि.२०/३/१९८७ ते ६/६/१९८७ |
| ३ | मा.कै.अरविंद उर्फ नाना शितोळे | दि.१९/६/१९८७ ते १९/३/१९८८ |
| ४ | मा.कृष्णा शंकर उर्फ तात्या कदम | दि.१९/३/१९८८ ते २०/३/१९८९ |
| ५ | मा.कविचंद भाट | दि.२०/३/१९८९ ते २०/३/१९९० |
| ६ | मा.कै.सादबा उर्फ आप्पासाहेब काटे | दि.२०/३/१९९० ते २०/३/१९९१ |
| ७ | मा.कै.प्रभाकर नारायण साठे | दि.२०/३/१९९१ ते ७/३/१९९२ |
| ८ | मा.आझम फकीरभाई पानसरे | दि.७/३/१९९२ ते २०/३/१९९३ |
| ९ | मा.विलास विठोबा लांडे | दि.२०/३/१९९३ ते १९/३/१९९४ |
| १० | मा.रंगनाथ सदाशिव फुगे | दि.१९/३/१९९४ ते २०/३/१९९५ |
| ११ | मा.संजोग भिकू वाघेरे (पाटील) | दि.२०/३/१९९५ ते २१/३/१९९६ |
| १२ | मा.आर.एस.कुमार | दि.२१/३/१९९६ ते १३/३/१९९७ |
| १३ | मा.सौ.अनिता दत्तात्रय फरांदे | दि.१३/३/१९९७ ते २०/३/१९९८ |
| १४ | मा.हनुमंत भिमराव भोसले | दि.२०/३/१९९८ ते २०/३/१९९९ |

| | | |
|---|---|---|
| १५ | मा.कै.मधुकर रामचंद्र पवळे | दि.२०/३/१९९९ ते २४/११/२००० |
| १६ | मा.लक्ष्मण पांडुरंग जगताप | दि.१९/१२/२००० ते १३/३/२००२ |
| १७ | मा.प्रकाश बंडोबा रेवाळे | दि.१३/३/२००२ ते १८/२/२००५ |
| १८ | मा.सौ.मंगलाताई कदम | दि.१८/२/२००५ ते १३/३/२००७ |
| १९ | मा.डॉ.वैशाली घोडेकर (लोंढे) | दि.१३/३/२००७ ते २३/५/२००८ |
| २० | मा.सौ अपर्णा निलेश डोके | दि.६/६/२००८ ते ३०/११/२००९ |
| २१ | मा.योगेश मंगलसेन बहल | दि.१/१२/२००९ ते १३/३/२०१२ |
| २२ | मा.सौ.मोहिनीताई विलास लांडे | दि.१३/३/२०१२ ते १२/९/२०१४ |
| २३ | मा.सौ.शकुंतलाताई भाऊसाहेब धराडे | दि.१२/९/२०१४ पासून |

वरील प्रमाणे दि.२३/३/१९८६ ते आजतागायत (दि.७/८/२०१५)अखेर एकूण २३ सन्माननिय नगरसदस्य यांनी महापौर पद भूषविलेले आहे. तरी महापौर चषक क्रीडा स्पर्धेस एका खेळाला एका महापौरांचे नाव देणेस, तसेच जस जशा महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील,तस तशा स्पर्धेस प्रस्तावात नमुद प्रमाणे मा.माजी महापौर यांचे नाव अ.क्र.नुसार देणेस, मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक सभेमार्फत, मा.स्थायी समिती सभेची व मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महापौर चषक क्रीडा स्पर्धेस एका खेळाला एका महापौरांचे नाव देणेस, तसेच जस जशा महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातील, तस तशा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव अ.क्र.नुसार देणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे  शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७०१/२०१५
दिनांक : ०१/१०/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.